## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- १४/२०२५

**अपिलार्थी, श्री.प्रकाश पी. कुकरेजा**
शॉप नं.२, हरी ओम अपार्टमेंट
ब्लॉक सी-३३/आर-१२४, चोपडा कोर्ट
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००३.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक,
सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग,उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : .१६.०६.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २२.०५.२०२४ | -- | ०१.०७.२०२४ | ०५.१२.२०२४ |

अपिलार्थी यांनी दि. ०३.०१.२०२५ रोजीच्या अर्जान्वये *"Information not given inspite of direction by the First Appellate Authority "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १६.०६.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.मनोज विष्णू जाधव, मुख्य लिपीक, सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" Information about Publication of Administrative and Statement of Accounts Report under Section 94 (3) of MMC Act 1949.*

*Please give me the copies of publication of Administrative and statment of Accounts Report under Section 94 (3) in the Stuctured format perscribed by standing Committee Resolution No.64 dated 28/03/2003 under Section 94(2) of MMC Act for the year 2014-2015 to 2023-2024."*

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने उल्हासनगर महानगरपालिकेला निर्देश दिलेले आहेत. तथापि त्या निर्देशांचे देखील पालन उल्हासनगर महानगरपालिकेने केलेले नाही. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.०५.१२.२०२४ रोजीच्या आदेशान्वये सदरची माहिती १५ दिवसात अपिलार्थी यांना देण्याचे आदेश पारित केले आहे. त्यानुसार सुध्दा आपणास माहिती देण्यात आलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात असा खुलासा केला की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अद्यापपर्यंत तयार झालेली नाही. त्याप्रमाणे अपिलार्थी यांना दि.२७.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. सदर पत्राची प्रत सादर केली आहे. सदरचे पत्र आपण नोंदणीकृत पोच देय डाकेने अपिलार्थी यांना पाठविलेले आहे.

तथापि अशा प्रकारचे पत्र अपिलार्थी यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांनी नकार दिला आहे. याकारणामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना सदर दि.२७.१२.२०२४ रोजीचे पत्र पाठविल्याबाबतचा पुरावा आयोगासमोर स्वत: उपस्थित राहून सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना सदर दि.२७.१२.२०२४ रोजीचे पत्र पाठविल्याबाबतचा पुरावा आयोगासमोर स्वत: उपस्थित राहून सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१४.०७.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्रे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ जून, २०२५.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र